**CNR NO-MHSO060004222021**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३६/२०२१**

**कृष्णा ढोकळे**

**वि.**

**निवृत्ती सावंत व इतर.**

# नि. क्र. १९ वरील आदेश
# (घोषित दि. १७/११/२०२२)

०१] प्रस्तुतचा अर्ज अर्जदारातर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे अर्जामध्ये दुरुस्तीकरीता दाखल करण्यात आलेला आहे. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ यांचा दि.०३/०८/२०१५ रोजी मृत्यु झालेला आहे मयत गैरअर्जदार क्र.१ यांना पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असे कायदेशीर वारस असून त्यापैकी मुलगा लक्ष्मण हा या पूर्वीच गैरअर्जदार क्र.२ आहेत. सबब, मयत गैरअर्जदार क्र.१ यांच्या इतर वारसांना अर्जात समाविष्ठ करण्याकरीता व त्या अनुषंगाने दुरुस्ती करण्याबाबत परवानगी मिळणेकरीता विनंती करण्यात आलेली आहे.

०२] गैरअर्जदार क्र.२ तर्फे प्रस्तुत अर्जास प्रखर विरोध करण्यात आलेला आहे.

०३] माझे समोर पुढील मुद्दे उपस्थित होतात त्यावर माझे असलेले निष्कर्ष व त्याकरीता असलेली कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार अर्जात दुरुस्ती होवून मिळणेस पात्र आहे काय ? | होय |
| २. | अंतिम आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबतः–**

०४] प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी दावा क्र. ८०/२०१२ जो करारपूर्ततेकरीता दाखल केला होता व जो अर्जदाराच्या गैरहजेरीमुळे खारीज झालेला आहे तो दावा पुन्हा पटलावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल करण्यात आलेला आहे. निश्चितपणे दिवाणी दाव्यामध्ये मयत गैरअर्जदारांच्या इतर वारसांचे मौलिक

हक्क गुंतलेले आहेत व मुळ दाव्यात जो काही आदेश पारीत होईल त्यामुळे कायदेशीर वारसांचे हक्कांवर बंधनकारक असणार आहे अश्या परीस्थीतीत मयत गैरअर्जदार क्र. १ यांच्या इतर वारसांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. मयत गैरअर्जदार क्र.१ यांच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसांना मिळकतीबाबतचे दिवाणी हक्क प्राप्त झालेले आहेत. अश्या परिस्थीतीत गैरअर्जदार क्र. १ यांच्या इतर वारसांना पटलावर घेणे आवश्यक आहे.

०५] अर्जदाराने केलेल्या विनंतीनुसार दुरुस्तीची परवानगी दिल्यास गैरअर्जदारांचे कोणतेही नुकसान होणार नाही तथा प्रकरणाच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही परंतु अर्ज नामंजूर झाल्यास अर्जदाराचे अतोनात नुकसान होणार आहे. अश्या परिस्थीतीमध्ये अर्जदार विनंती केल्यानुसार दुरुस्ती करुन मिळणेस पात्र असल्याचे माझे मत झाले आहे. करीता मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देतो.

**<u>मुद्दा क्र. २ बाबतः–</u>**

०६] वरील सर्व विवेचनावरुन प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य असल्याचे माझे मत झाले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२ मयत गैरअर्जदार क्र. १ चे वारसांना पटलावर घेण्याची तथा अनुषंगिक दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३ अर्जदाराने विहीत मुदतीत सदरची दुरुस्ती करावी व पुढील तारखेपावेतो दुरुस्ती प्रत सादर करावी. त्यानंतर मयत गैरअर्जदार क्र. १ यांच्या वारसांना अर्जाची नोटीस पाठविण्यात यावी.

४ खर्च मुळ प्रकरणात.

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2022.11.17 17:31:44 +0530

**दि.१७/११/२०२२.**

**(अमित अ.खंडाळे)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपूर.**

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | 2nd Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 17.11.2022 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 17.11.2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 17.11.2022 |